दिनांक १३.०६.२०२५ रोजी टाकळी माळी ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृतक सोमीनाथ सुखदेव जाधव यांचे कुटूंबियास भेट





दिनांक १३.०६.२०२५ रोजीकुबेर गेवराई,ता. जि.  छत्रपती संभाजीनगर येथे मृतक श्रीधर दादाराव कुबेर यांचे कुटूंबियास भेट





छत्रपती संभाजीनगर जिल्हा 19-06-2025

# गेवराई : आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला बियाणे किट वाटप

प्रतिनिधी | लाडसावंगी

गेवराई कुबेर येथील आत्महत्या ग्रस्त शेतकरी श्रीधर दादाराव कुबेर यांच्या कुटुंबाला वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश होलोंडे पाटील यांनी भेट दिली. त्यांनी कुबेर यांच्या पत्नी अरुणा कुबेर यांचे सांत्वन केले. त्यांच्यासोबत स्वीय सहायक कृष्णकुमार देठे उपस्थित होते. ॲड. होलोंडे पाटील यांनी ग्रामविकास, महिला व बाल विकास, महसूल आणि कृषी विभागाच्या योजनांचा लाभ अरुणा कुबेर यांना मिळावा, यासाठी सूचना दिल्या. त्यांच्या हस्ते अरुणा कुबेर यांना पेरणीसाठी बियाणे किट देण्यात आले.

या वेळी तालुका कृषी अधिकारी मेघशाम गुळवे, ग्रामविकास अधिकारी काकटाने, नायब तहसीलदार कैलास वाघमारे, मंडळ कृषी अधिकारी रोहीदास राठोड, मंडळ अधिकारी



मौजे गेवराई कुबेर येथे शेतकरी कुटुंबाची भेट.

दादाराव गोरे, उपकृषी अधिकारी संगीता उकर्डे, सहाय्यक कृषी अधिकारी रंजना राठोड, महसूल अधिकारी सुधीर महाजन उपस्थित होते. सरपंच मंगलाबाई कुबेर, नेमीनाथ कुबेर, गोरख कुबेर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १३.०६.२०२५ रोजी फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृतक रामा बंडू दाभाडे यांचे कुटूंबियास भेट





दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 14-06-2025

# शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सर्व योजनांचा लाभ द्या : निलेश हेलोंडे



फुलंब्री | वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंढे यांनी फुलंब्रीतील आत्महत्या केलेल्या शेतकरी राम बंडू दाभाडे यांच्या कुटुंबाची शुक्रवारी सायंकाळी भेट घेतली. त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याचे निर्देश दिले. हेलोंडे यांनी फुलंब्री तालुक्यातील शासकीय योजनांची माहिती घेतली. दाभाडे कुटुंबाला शेती साहित्य भेट दिले. ग्रामविकास योजना, कृषी विभाग योजना, महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा लाभ देण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी प्रभारी तहसीलदार संजीव राऊत, गटविकास अधिकारी उषा मोरे आदी उपस्थित होते.

# आत्महत्या करने वाले किसान के परिजन से भेंट



फुलंब्री में आत्महत्या करने वाले किसान के परिजन से शुक्रवार को चर्चा करते हुए वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन के अध्यक्ष नीलेश हेलोंडे.

**फुलंब्री.** 'वसंतदादा नाईक शेती स्वावलंबन मिशन' के अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा प्राप्त) नीलेश हेलोंडे ने शुक्रवार को फुलंब्री निवासी आत्महत्या करने वाले किसान के परिजन से मुलाकात की. इस दौरान उन्होंने पीड़ित परिवार को सरकारी योजना के तहत हरसंभव मदद करने के आदेश विभिन्न विभागों के अधिकारियों को दिए. फुलंब्री तहसील में बीते साल भर में सात किसानों ने आत्महत्या कर ली थी. इनमें से फुलंब्री निवासी किसान राम बंडू दाभाड़े के परिजनों से शुक्रवार को हेलोंडे ने मुलाकात की. साथ ही उन्हें कृषि सामग्री प्रदान की. तहसील कार्यालय, पंचायत समिति, कृषि विभाग, महिला एकात्म बाल विकास आदि विभागों से मृत किसान के परिवार को हरसंभव मदद देने का आग्रह भी उन्होंने किया. इस दौरान तहसीलदार संजीव राऊत, गट विकास अधिकारी उषा मोरे, महिला एकात्म बाल विकास परियोजना अधिकारी मनीषा कदम उपस्थित रहे.

Apna Shahar
Page No. 3 Jun 14, 2025
Powered by: erelego.com

दिनांक १७.०६.२०२५ रोजी हिंगणा येथील बायोचार निर्मिती प्रकल्पास भेट








दिनांक १८.०६.२०२५ रोजी कवठळ, ता. मोर्शी येथे मृतक अरुण लालाजी नेवारे यांच्या कुटूंबियास भेट






दिनांक १८.०६.२०२५ रोजीशिरखेड, ता.  मोर्शी येथे मृतक प्रविण रामदास बेंडे यांचे कुटूंबियास भेट.



दिनांक १८.०६.२०२५ रोजीचांदूरबाजार येथे पंचायत समिती सभागृहामध्ये चारा लागवड करणा–या शेतक–यांना थोंबे वाटप कार्यक्रमास उपस्थित



TheHitavada
Vidarbha Line | 2025-06-25 | Page- 4
ehitavada.com

# Fodder distribution programme for farmers held

■ **Our Correspondent**
CHANDUR BAZAR, June 24



Adv Nilesh Helonde Patil addressing the programme.

"GOVERNMENT Schemes must be made accessible to families of farmers who have committed suicide," said by Adv Nilesh Helonde Patil, Chairman of the Late Vasantrao Naik Sheti Swavlamban Mission, while speaking at the Panchayat Samiti Hall in Chandur Bazar during a programme organised to distribute fodder bundles to farmers involved in fodder cultivation, recently.

Adv Helonde personally distributed fodder bundles to farmers growing fodder in the taluka in Panchayat Samiti hall in Chandur Bazar.

Following the event, he visited the residence of late Ravi Rajendra Palsapgar, a farmer from Phubgaon who had committed suicide and met his family to understand their issues and hardships.

Since 2023, 19 farmers from the tehsil committed suicide. These farmers belonged to villages including Sonori, Wadura, Shirjgaon Kasba, Nimbhora, Karanja Bahiram, Talegaon Mohana, Visroli, Belora, Phubgaon, Talni Purna, Pralhadpur, and Belmandali. Adv Helonde instructed officials concerned to personally visit the families of these victims, understand their problems, and take steps towards resolving their issues.

Superintendent Agricultural Officer from the Divisional Commissioner's Office Nilesh Thombre, Deputy Chief Executive Officer Balasaheb Bayas, Tehsildar from Chandur Bazar Ramdas Shelke, Block Development Officer Dr Nilesh Wankhade, Tehsil Agriculture Officer Falguni Nanir and others were prominantly present on the occasion.

Under the Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme, fodder cultivation has been ongoing since last year on E-class lands in Karjgaon and Kuhra villages.

This year, the area under cultivation is expected to increase, which will help alleviate the fodder shortage in rural areas. Fodder will also become available for the livestock of families affected by farmer suicides.

Powered by Bharati Web

दिव्य मराठी
अमरावती सिटी 20-06-2025

सूचना • ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते चांदूर बाजार पं. स.मध्ये शेतकऱ्यांना थोबे वितरण

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबापर्यंत योजना न्या

प्रतिनिधी | चांदूर बाजार



ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची भेट घेतली.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबापर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहोचवा, असे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी चांदूर बाजार येथील पंचायत समिती सभागृहात आयोजित चारा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना थोबे वाटप कार्यक्रमात दिले.

तालुक्यातील चारा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आज पंचायत समिती येथे वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांच्या हस्ते थोबे वाटप करण्यात आले. त्यानंतर तालुक्यातील फुब्गाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी रवी राजेंद्र पळसपगार यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. २०२३ पासून आतापर्यंत १९ शेतकऱ्यांच्या तालुक्यात आत्महत्या झाल्या आहेत. त्यात सोनोरी, वडुरा, शिरजगाव कसबा, निंभोरा, कारंजा, बहिरम, तळेगाव मोहना, विस्रोळी, बेलोरा, फुब्गाव, तळणी पूर्णा, प्रल्हादपूर, बेलमंडळी या गावांतील शेतकऱ्यांचा समावेश आहे. या आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या गावात जाऊन त्या कुटुंबांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या व निराकरण करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना ॲड. हेलोंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या वेळी विभागीय आयुक्त कार्यालयाचे अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, चांदूर बाजार तहसीलदार रामदास शेळके, गटविकास अधिकारी डॉ. नीलेश वानखडे, तालुका कृषी अधिकारी फाल्गुनी ननीर आदी उपस्थित होते.

तालुक्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत करजगाव व कुऱ्हा येथील ई क्लास जमिनीवर मागील वर्षापासून चारा लागवड सुरू करण्यात आली आहे. या वर्षी हे क्षेत्र वाढणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील चाऱ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटणार आहे. आत्महत्याग्रस्त परिवाराला देखील आपल्या पशुधनासाठी चारा उपलब्ध होईल.

दिनांक १८.०६.२०२५ रोजी फुबगांव, ता.  चांदूरबाजार येथे मृतक रवि राजेंद्र पळसपगार यांचे कुटूंबियास भेट.





# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवारापर्यंत योजना पोहोचवा

## अॅड. नीलेश हेलोंडे : पंचायत समितीत थोंबे वाटप कार्यक्रम

अॅग्रोवन वृत्तसेवा

चांदूरबाजार, अमरावती : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवारापर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहोचवा. तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या गावात जाऊन त्यांच्या भेटी घ्या व त्यांच्या समस्या जाणून त्या निराकरण करण्याचा प्रयत्न करा, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. नीलेश हेलोंडे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

चांदूरबाजार येथील पंचायत समिती सभागृहामध्ये चारालागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना थोंबे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. चांदूरबाजार तालुक्यातील चारा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना पंचायत समिती येथे कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष अॅड. हेलोंडे यांच्या हस्ते थोंबे वाटप करण्यात आले. त्यानंतर तालुक्यातील फूबगाव येथील शेतकरी आत्महत्याग्रस्त रवी राजेंद्र पळसपगार यांच्या कुटुंबीयांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या वेळी अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश ठोंबरे, बाळासाहेब बायस आदी उपस्थित होते.

दिनांक १९.०६.२०२५ रोजी श्री दिनेश डागा, विभागीय उप सरव्यवस्थापक, महा. राज्य कृषी पणन मंडळ अमरावती यांचे समवेत **APMC** मध्ये शेतक-यांचेशेतमालसंबंधी व्यवस्थेबाबत बैठक व चर्चा



दिनांक १९.०६.२०२५ रोजी व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, अमरावती यांचे समवेत शेतकऱ्यांकरिता बँकेमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत बैठक व चर्चा



दिनांक २७.०६.२०२५ रोजी रामापूर (धारुड) ता. अकोट, जि. अकोला येथील मृतक प्रमोद रमेश धुर्वे यांच्या कुटूंबियास भेट





दिनांक २७.०६.२०२५ रोजी रामापूर (धारुड) ता. अकोट, जि. अकोला येथील जिल्हा परिषद शाळेस भेट व वृक्षारोपण





दिनांक २७.०६.२०२५ रोजी रुधारी (पोपटखेड) ता. अकोट जि. अकोला येथे गटविकास अधिकारी, तहसिलदार यांच्या समवेत प्रस्तावित कुरण विकास अंतर्गत निश्चित केलेल्या जागेस भेट व पाहणी





दिनांक २७.०६.२०२५ रोजी पोपटखेड येथील जिल्हा परिषद शाळेस भेट व मैदान पाहणी तसेच शाळेच्या मैदानामध्ये लॉनटेनिस खेळाचे ग्राऊंडचा प्रस्ताव जिल्हा क्रिडा अधिकारी यांना सादर करण्याबाबत सुचना





दिनांक २७.०६.२०२५ रोजी अडगांव (बु.), ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मृतक गजानन काशिनाथ वलगांवकर यांचे कुटूंबियास भेट



